**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 173 B.N.S.S)**

## प्रथम खबर अहवाल

**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S. (पोलीस ठाणे):** माळशिरस **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0411 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/08/2026 11:44 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** मधले दिवस **Date from (दिनांक पासून):** 21/08/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 28/08/2026

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 12:18 तास **Time To (वेळेपर्यंत):** 14:30 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 29/08/2026 **Time (वेळ):** 11:44 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 012 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 29/08/2026 11:44 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पूर्व, 1 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** पालखी महामार्गावरिल माळशिरस-, पिलीव रोडवरील ब्रिजखाली , माळशिरस ,माळशिरस

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** निता चत्रभुज मिसाळ

(b) **Husband's Name (चे नाव ):** चत्रभुज मिसाळ

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1979 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, , पुणे, बंडगार्डन, पुणे शहर, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, , पुणे, बंडगार्डन, पुणे शहर, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9822214414

**7.**

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

**Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | आबा सावळा वळकुंदे | | | 1. Town/Village (शहर / गाव): वळकुंदे मळा,61 फाटा,Tehsil (तहसील): माळशिरस,Police Station (पोलीस ठाणे): माळशिरस,District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | महोदव पंढरी माने | | | 1. Town/Village (शहर / गाव): मोटेवाडी,Tehsil (तहसील): माळशिरस,Police Station (पोलीस ठाणे): माळशिरस,District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 3 | पोहेकॉ अनिल शिंदे | | | 1. वन अकलुज सोसायटी पोलीस कॉलनी,Town/Village (शहर / गाव): अकलुज,Tehsil (तहसील): माळशिरस,Police Station (पोलीस ठाणे): अकलुज,District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4 | पोहेकाँ राहुल मारुती वाघ | | | 1. Town/Village (शहर / गाव): अकलुज पोलीस लाईन अकलुज,Tehsil (तहसील): माळशिरस,Police Station (पोलीस ठाणे): अकलुज,District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8.** **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9.** **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| **S. No. (अ.क्र.)** | **Propertty Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (विवरण)** | **Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये)** |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**10.** **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

**11.** **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| **S. No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.)** |
|---|---|

**12.** **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्यादी जबाब दि. 29/08/2026.

मी निता चत्रभुज मिसाळ वय 47 वर्षे व्यवसाय- शायकीय नोकरी पद- पोलीस उपअधीक्षक, नेमणुक - लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे मोबा.क्र.9822214414

आज रोजी समक्ष हजर राहून सरकारतर्फे फिर्यादी जबाब देते की, दि.21/08/2026 रोजी मी आमचे वरिष्ठांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे 09.00 वाजता मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयात हजर झाले. सदरवेळी पोलीस उपअधीक्षक श्री सतिश वाळके यांनी त्यांच्या कक्षात बोलावून तक्रारदार श्री. संतोषकुमार महादेव माळवे वय 39 वर्षे व्यवसाय - सरकारी नोकरी (ग्राम पंचायत अधिकारी, गोंदवले बुद्रुक ता.माण (दहिवडी) जि. सातारा) रा. मु.पो. पळशी ता. माण जि. सातारा मोबा.क्र. 9011625697 व त्यांचे आतेभाऊ श्री किरण नंदकुमार खाडे वय 36 वर्षे व्यवसाय - शासकीय नोकरी पद- सहाय्यक लेखापाल- कोल्हापुर महानगरपालिका रा.मु.पो.पळशी ता. माण जि. सातारा यांची ओळख करून देवून श्री संतोषकुमार माळवे यांची लोकसेवकाविरूद्ध लाचेविषयीची तक्रार असुन त्यांची

लेखी तक्रार घेवून सदर तक्रारीचे अनुशंगाने पुढील कायदेशीर कार्यवाही करावी असे आम्हास आदेशित केले. त्यानंतर श्री संतोष माळवे व किरण खाडे यांना मी माझे केबिनमध्ये घेवून आले. पोलीस उपअधीक्षक श्री. वाळके यांनी सदर कारवाईकामी मला पोलीस निरीक्षक मिथुन म्हात्रे, सापळा पथकातील अंमलदार सपोफौ बाठे, पोशि 1966/प्रविण तावरे, पोशि 9175/अश्विन कुमकर तसेच शासकीय वाहन क्र.एमएच 12 युसी 4109 व त्यावरिल चालक कदम 4337/चंद्रकांत कदम व शासकीय वाहन क्र.एमएच 12 आरवाय 7271 व त्यावरिल चालक पोहवा सोनवणे असे पथक उपलब्ध करून दिले ते माझे केबिनमध्ये हजर झाले. तसेच पोलीस उपअधीक्षक वाळके यांनी पुणे महारनगरपालिका कार्यालयास पत्रव्यवहार केला असून त्यांचेकडून प्राप्त होणारे दोन पंच साक्षीदार मला प्रतिवेदन करतील असे सांगितले.

त्यानंतर सुमारे 10.50 वाजता पुणे महानगरपालिका कार्यालयाकडील रचना भवन विभागातील शाखा अभियंता श्री प्रशांत महादेव धुळे व पथ विभागातील शाखा अभियंता श्री. भिमराव गंगाधर खरे असे दोन पंच साक्षीदार माझे कक्षात हजर झाले. त्यावेळी मी तक्रारदार माळवे, त्यांचा आतेभाऊ किरण खाडे, दोन्ही पंच साक्षीदार व सापळा पथक यांची आपसात ओळख करून दिली. तक्रारदार माळवे यांचे तक्रारीवरून करण्यात येणा-या सापळा कारवाईकामी पंच साक्षीदार म्हणून काम करण्यास दोन्ही पंचांनी सहमती दिल्यानंतर मी तक्रारदार माळवे यांना त्यांचे तक्रारीबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांची तक्रार प्रथम तोंडी कथन करून नंतर स्व:हस्ताक्षरामध्ये लिहून दिली ती थोडक्यात पुढील प्रमाणे- “तक्रारदार संतोषकुमार माळवे यांचा सख्खा भाऊ संदिप माळवे व किरण खाडे यांचा सख्खा भाऊ महेश खाडे व इतर यांचे विरुध्द अकलुज पोलीस स्टेशन, सोलापुर ग्रामीण येथे गु.र.क्र. 564/2026 भारतीय न्याय संहिता 2023 कलम 109(1), 132, 121(1), 127(2), 351, 351(2), 352, 3(5) प्रमाणे दि.19/08/2026 रोजी गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाचा तपास उपविभागीय अधिकारी अकलुज श्री संतोष शिवाजी वाळके यांचेकडे आहे. तसेच सदर गुन्हयातील आरोपी म्हणजचे महेश खाडे व त्यांचे आई-वडिल, संदिप माळवे व इतर आरोपींची अटकपुर्व जामीन अर्जाची प्रकिया सुरू आहे.

सदर गुन्हयाचे एक दिवस अगोदर दि.18/08/2026 रोजी सायंकाळी 07.30 गुन्हयाचे घटनास्थळी लोकसेवक पोलीस अनिल शिंदे यांनी तक्रारदार माळवे यांचेकडे सदरचा गुन्हा दाखल न करण्यासाठी रु.25,00,000/- मागणी केली होती त्यास त्यांनी नकार दिला. त्यानंतर गुन्हा दाखल झाला व सदर गुन्हयातील आरोपी महेश खाडे, त्यांचे आई-वडिल व संदिप माळवे यांना अटकपुर्व जामीनकामी मदत करण्यासाठी तसेच पीसी अॅन्ड पीएनडीटी कायदयाची कलमे न लावण्यासाठी व गुन्हयात मदत करण्यासाठी तपास अधिकारी डीवायएसपी श्री संतोष वाळके यांचे रायटर श्री अनिल शिंदे यांनी खाजगी मध्यस्थी इसम आबा सावळा वळकुंदे यांचे मार्फतीने डीवायएसपी वाळके यांचेकरीता एकुण 25,00,000/- व अनिल शिंदे यांनी त्यांचे स्वत:करीता रु.5,00,000/-इतकी लाचेची मागणी दि.19/08/2026 रोजी रात्री गुन्हयाचे घटनास्थळी केली. तसेच सदरवेळी सुमारे 10.30 ते 10.45 वा.चे दरम्यान श्री आबा वळकुंदे यांनी त्यांचा मोबा.क्र. 9766431581 वरून पोलीस अनिल शिंदे यांचा मोबा.क्र.9922001659 वर फोन करून किरण खाडे यांचे अनिल शिंदे यांचेशी बोलणे देखील करून दिले.

त्यानंतर रुपये पंचवीस लाखांपैकी रु.10,00,000/- रक्कम पोलीस अनिल शिंदे यांनी गुन्हयातील

आरोपी महेश खाडे यांची पोलीस मैत्रिण रुपाली फडतरे व आबा वळकंुदे यांचे मार्फतीने म्हसवड पोलीस स्टेशनजवळ दि.20/08/2026 रोजी रात्रौ 01.00 वाजता प्राथमिक आरोग्य केंद्राशेजारी, सिध्दनाथ मंदिर कमानीजवळ, म्हसवड येथे डीवायएसपी वाळके यांचेकरीता स्वीकारली आहे. तरी उर्वरित रक्कमेकरीता त्यांनी तगादा लावला असल्याने त्यांचे विरुध्द आपले विभागामार्फत कायदेशीर कारवाई करावी." याप्रमाणे तक्रारदार माळवे यांची थोडक्यात तक्रार असून सदरबाबत त्यांची सविस्तर मुळ तक्रार घेण्यात आलेली आहे.

त्यानंतर तक्रारदार माळवे, दोन्ही पंचसाक्षीदार यांना मी ला.प्र.वि.पुणे विभागाकडून करण्यात येणा-या पडताळणी व सापळा कारवाईबाबतची सविस्तर माहिती दिली व त्याकामी पंच क्र. 1 म्हणून श्री प्रशांत महादेव धुळे व पंच क्र. 2 म्हणून श्री. भिमराव गंगाधर खरे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. मी व दोन्ही पंचांनी तक्रारदार यांची तक्रार वाचून त्यावर सहया केल्या. त्याच दरम्यान सुमारे 11.37 वाजता लोकसेवक पोलीस अनिल शिंदे यांचा मोबा.क्र.9922001659 वरून तक्रारदार श्री माळवे यांना त्यांचा मोबा.क्र. 9011625697 वर साधा फोन कॉल आला. दोघांमध्ये होणारे संभाषण ध्वनिमुद्रीत करणे आवश्यक असल्याने तक्रारदार यांनी जास्त काही न बोलता बीडीओ साहेबासमोर असून नंतर फोन करतो असे सांगुन फोन कट केला. त्यानंतर मी तक्रारदार माळवे यांना ते लोकसेवक पोलीस अनिल शिंदे व डीवायएसपी वाळके यांची भेट घेणेकरीता कधी जाणार आहेत अशी विचारणा केली असता त्यांनी पोलीस शिंदे यांचा फोन येवून गेल्याने त्याच दिवशी म्हणजेच दि.21/08/2026 रोजी त्यांना फोन करून ते सांगतील त्या ठिकाणी अगर डीवायएसपी ऑफिस, अकलुज या ठिकाणी जावून त्यांची भेट घेणार आहे असे सांगितले. त्यानुसार तक्रारदार माळवे यांच्या तक्रारीनुसार लोकसेवक अनिल शिंदे व डीवायएसपी वाळके यांची तक्रारदार श्री माळवे यांचेकडे लाचेची मागणी आहे अगर कसे? याबाबत पडताळणी कारवाई कारवाईकामी निवेदने ध्वनिमुद्रीत करण्यासाठी शासकीय सोनी कंपनीच्या व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन सीलपॅक व्हीएम एलाईट कंपनिचे मेमरीकार्ड दोन्ही पंचासमक्ष घातले. त्याचे पुढील बाजुस C- VM Elite 32 GB C10 U1 V10 micro SD व त्याचे मागील बाजुस CE MM32GC10YSB16-289 HC 260107 SM MADE IN TAIWAN EVMTF/32GB0126SE असे छापलेले होते. तसेच निवेदन ध्वनिमुद्रती करतेवेळी व्हिडीओ चित्रिकरण करण्याकरीता शासकीय सोनी कंपनीच्या व्हिडीओ रेकॉर्डरमध्ये सॅनडिस्क कंपनीचे मेमरीकार्ड दोन्ही पंचासमक्ष घातले. त्याचे पुढील बाजुस SanDisk 16GB micro SD HC I C4 व त्याचे मागील बाजुस VS-XY7/25 CE MMC08AX215F-TO KF XAH 2507 MADE IN TAIWAN असे छापलेले होते. त्यानंतर मी दिलेल्या सुचनेवरून पोशि तावरे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये तक्रारदार, पंच क्र.1 व पंच क्र.2 यांची पडताळणी निवेदने 12.18 वाजता ध्वनिमुद्रीत केली. सदरवेळी पोशि कुमकर यांनी त्यांचेकडील शासकीय व्हिडीओ रेकॉर्डरद्वारे व्हिडीओ शुटींग केले.

त्यानंतर सापळा कारवाईकरीता आवश्यक असलेलं साहित्य घेऊन मी, दोन्ही पंच, पोशि तावरे व तक्रारदार श्री माळवे असे शासकीय वाहन इरटिगा एमएच क्र.12 युसी 4109 यामध्ये बसून तसेच महिंद्रा टीयुव्ही एमएच 12 आरवाय 7271 या वाहनांमध्ये पोलीस निरीक्षक मिथुन म्हात्रे, पोशि कुमकर, सपोफा बाठे असे बसून सुमारे 12.34 वाजता रवाना झालो. तसेच श्री.किरण खाडे हे देखील आमचे पाठोपाठ तक्रारदार यांचे खाजगी वाहन ह्युन्डाई क्रेटा क्र.एमएच 11 डीएच 9596 ने रवाना

झाले. पुणे ते अकलुज हे अंतर जास्त असल्याने मी शासकीय वाहनामध्येच तक्रारदार व पंचांना पडताळणी कारवाईचे अनुषंगाने सविस्तर सुचना दिल्या. आम्ही प्रवासामध्ये पालकी महामार्गाने फलटण गावचे आसपास पोहचलो असता दोन्ही पंचासमक्ष आबा वळकुंद्दे यांचा मोबा.क्र. 9766431581 वरून तक्रारदार यांचा मोबाईल क्र.9011625697 वर सुमारे 14.51 व 14.59 वाजता मिस कॉल येवून गेले. त्यामुळे शासकीय वाहन रस्त्याचे एका बाजूस पार्क केले. त्यावेळी आबा वळकुंद्दे यांचा दोन्ही पंचासमक्ष पुन्हा 15.15 वाजता साधा कॉल आला असता तक्रारदार यांनी फोनचा स्पीकर ऑन करून तो कॉल घेतला. त्यावेळी आबा वळकुंद्दे व तक्रारदार यांचेत तक्रारदार यांचा आरोपी भाऊ व इतर यांचे अटकपुर्व जामीनाचे संदर्भाने चर्चा झाली. त्या दरम्यान तक्रारदार माळव यांनी वळकुंद्दे यांना "विषय काये?" अशी विचारणा केली असता आबा वळकुंद्दे यांनी "त्या आपल्या संदिपचाच विषय ओ…"असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार व आबा वळकुंद्दे यांचेत तक्रारदार यांचा भाऊ व किरण खाडे यांचा भाऊ महेश खाडे व आई-वडिल सोडून इतर दोन आरोपीं पाटील व ठेंगल यांचेबाबत चर्चा झाली. नमूद दोन्ही आरोपींकडून अटक न करण्यासाठी डीवायएसपी श्री वाळके यांचेकरीता आबा वळकुंद्दे यांनी प्रत्येकी पाच प्रमाणे एकुण 10,00,000/-रुपये स्वीकारल्याचे होते परंतु त्यांना गुन्हयात अटक करायची असल्याने सदर रक्कम परत करणार असल्याचे सांगितले. तसेच "ते म्हणत्यात त्यांला सहकार्य नाई तुम्ही चौघ जण आपले हायेत की नाही हितले नाव…आई वडील.. संदिप अनं डॉक्टर…. हया चौघाचा विषय हाय" असे बोलून डीवायएसपी श्री वाळके हे यांनाच मदत करणार असल्याचे वळकुंद्दे यांनी सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी "किती पैसे मागत्यात ते…" असे विचारले असता आबा वळकुंद्दे यांनी "ते काय पंचवीस लाख रुपये…"असे तक्रारदार यांना सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी "कोण मागतयं पंचवीस लाख" असे विचारले असता आबा वळकुंद्दे यांनी "आओ शिंदे…. तो तुमच्या पाशीच….शिंदेला होता पा….तो डीवायएसपाचाच माणुस हाय" असे तक्रारदार यांना सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी "अरं कमी करायला पाहिजेना….पैसे काय…माझे बी जाणारे ना पैसे..तु जरा कमी कराय पाहिजेना असे बोलून विनंती केली असता आबा वळकुंद्दे यांनी "तुम्ही हे बोलताय म्हणुन तर राडा झालाय.. त्या दिशी इंथंच विषाक लाख फेकाय पाहिजे होतं तोंडावर (गुन्हा दाखल केलेल्या दिवशी गुन्हा दाखल न करण्यासाठी)…त्याची आई घातली झालता तयार" असे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी "हम्म" असा प्रतिसाद दिला व आणखी चर्चा केली असता आबा वळकुंद्दे पुणेयांनी "पण आपण डिमांड आता आम्ही ठरवलंय सगळं अनं आता कसं कमी करायचं सांगा बरं.. आम्ही काल परवा तेरवा चालुये त्याच्यात" असे सांगितले त्यावर तक्रारदार आणखी चर्चा करून तक्रारदार यांनी "तो अनिल शिंदे तो पोलीस आहे तोच मागतोय का पंचवीस लाख रुपये" विचारले असता आबा वळकुंद्दे यांनी "हा…पोलीस पण त्याच्याकडं सगळं व्यवहार आहेतं ही सगळीकुणचं मी चौकशी केलेलीये" असे बोलून खाजगी इसम आबा वळकुंद्दे यांनी तक्रारदार यांचा सख्खा भाऊ व महेश खाडे, त्यांचे आई-वडिल यांना गुन्हयात अटकपुर्व जामीन मंजुर करणेकामी मदत करण्यासाठी लोकसेवक पोलीस अनिल शिंदे व डीवायएसपी संतोष वाळके यांचेकरीता दोन्ही पंचासमक्ष रु.25,00,000/- लाचेची मागणी केली तसेच सदर गुन्हयातील इतर दोन आरोपी ठेंगल व पाटील यांचेकडून प्रत्येकी पाच असे एकुण 10,00,000/- रुपये स्वीकारल्याचे दोन्ही पंचासमक्ष निष्पन झाले. त्यानंतर तक्रारदार यांनी कधी भेटायच ठरलय असे विचारले असता वळकुंद्दे यांनी अर्धा-पाऊन तासात या अनिल शिंदेंची भेट करून त्यांचे मार्फतीने डीवायएसपी यांचेशी बोलणे करून

देतो असे सांगितले.

त्यानंतर 16.00 वाजताचे सुमारास आम्ही सर्व माळशिरस चौकामध्ये पोहचलो असता प्रवासादरम्यान आबा वळकुंदे यांचे तक्रारदार यांना 04 रेग्युलर फोन कॉल येवून गेले त्यामध्ये सुरूवातीचे तीन कॉलमध्ये वळकुंदे तक्रारदार यांना लवकर पोहचा आणि लवकर पोहचले तर पोलीस अनिल शिंदे यांना भेटून बोलण्यात गुंतवून ठेवा असे सांगत होते व 04 थ्या कॉलमध्ये तुम्ही येण्याला उशीर करताय म्हणून पोलीस शिंदे यांनी भेटण्यास येवून नका असे सांगिल्याचे कळविले. तक्रारदार यांना लोकसेवक शिंदे यांचा सकाळी कॉल येवून गेल्याने त्यांनी पोलीस शिंदे यांना साधे व व्हॉटसप तीन कॉल केले पहिल्या दोन कॉलची रिंग वाजली त्यानंतर शिंदे यांचा फोन बंद लागला. त्यानंतर आम्ही सर्व माळशिरस - अकलुज रोडवर शहरातील डॉ. इनामदार हॉस्पिटचे अलिकडे कॅनॉललगत या ठिकाणी पोहचलो. शिंदे यांचा फोन बंद असल्याने त्या दरम्यान तक्रारदार व वळकंुदे यांचेत अनुक्रमे 16.38, 16.48 वाजता झालेल्या दोन फोन कॉलमध्ये तक्रारदार माळवे यांनी थेट डीवायएसपी कार्यालयात जावून शिंदे व डीवायएसपी यांची भेट घेवू का अशी विचारणा केली असता वळकुंदे यांनी तुमचा सख्खा भाऊ गुन्हयात अटक न झाल्याने डीवायएसपी ऑफिस येथे गेल्यावर तुम्हाला बेकायदेशीर बसवून ठेवतील अशी भीती तक्रारदार यांना घातली. त्यामुळे दि.21/08/2029 रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली. तक्रारदार माळवे व आबा वळकुंदे यांचेत झालेले वरिल सर्व कॉल पोशि तावरे यांचे मार्फतीने व्हॉईस रेकॉर्डरमध्ये दोन्ही पंचांसमक्ष ध्वनिमुद्रीत करण्यात आले असून उपरोक्त कारवाईबाबत दोन्ही पंचांसमक्ष दि.21/08/2026 रोजी सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

दि.22/08/2026 रोजी तक्रारदार माळवे व आबा वळकंुदे यांचेत अनुक्रमे 19.26 व 20.54 वाजता दोन फोन कॉल झाले. त्यावेळी तक्रारदार यांनी ते दि.23/08/2026 रोजी सातारा येथे जाणार असल्याचे सांगितले. त्यानंतर दि.23/08/2026 रोजी तक्रारदार माळवे यांनी मला फोन करून कळविले की, आबा वळकुंदे यांना किरण खाडे यांचेशी प्रत्यक्ष भेटून बोलायचे असल्याने त्यांनी दि.24/08/2026 रोजी फोन करून या असे सांगितले आहे. तक्रारदार यांनी दिलेल्या त्यांचे तक्रारीमध्ये वळकुंदे यांचे फोनवरून किरण खाडे यांना लोकसेवक शिंदे यांचेकडून लाचेची मागणी झाली असल्याने किरण खाडे यांना व्हॉईस रेकॉर्डर व स्पाय कॅमेरा लावून पंच क्र.1 यांचेसोबत दि.24/08/2026 रोजी खाजगी इसम वळकुंदे यांची भेट घेणेकरीता पाठविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यानुसार दि.24/08/2026 रोजी मी, सापळा पथक व दोन्ही पंचसाक्षीदारांसह सापळा कारवाईकामी आवश्यक असलेल्या साहित्यासह दोन्ही शासकीय वाहनांनी ला.प्र.वि. कार्यालयातुन सकाळी 07.25 वाजता रवाना होवून सुमारे 11.00 वाजता माळशिरस फाटा येथे पोहचून त्यानंतर तक्रारदार यांचे सांगण्यावरून माळशिरस - म्हसवड हायवेलगत जलभावी फाटयावर पोहचलो. यावेळी शासकीय वाहनामध्ये टाटा सुमो क्र.एमएच 12 एन यु 5882 या शासकीय वाहनाचा समावेश करण्यात आलेला होता. तक्रारदार माळवे हे त्यांचेकडील चारचाकी वाहन ह्युंडाई क्रेटा क्र.एमएच 11 डीएच 9596 ने व श्री किरण खाडे हे त्यांचेकडील चारचाकी वाहन टाटा टिगोर क्र. एमएच 51 ए 8570 यासह 12.45 वाजता सदर ठिकाणी पोहचले. मी उपस्थित सर्वांना पडताळणी कारवाईचे अनुषंगाने सविस्तर सुचना दिल्या. किरण खाडे व वळकुंदे यांचे भेटी दरम्यान होणारे संभाषण ध्वनिमुद्रीत करण्यासाठी नवीन मेमरीकार्ड वापरण्याचे सर्वानुमते ठरविले. त्यानुसार सॅनडिस्क कंपनीचे नवीन सिलबंद मेमरीकार्ड

व्हॉईस रेकॉर्डमध्ये घातले. त्याचे पुढील बाजुस SanDisk 16 GB Micro SD HC I4 C मागील बाजुस ′É KKNB 07/25 CE MMC16GBCHJG-A26 YL AX215FD 2506 MADE IN TAIWAN असे छापलेले होते. निवेदन ध्वनिमुद्रीत करतेवेळी दि.21/08/2026 रोजीचे कारवाई दरम्यान वापरलेल्या मेमरीकार्डचा वापर करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. तसेच पडताळणी कारवाई दरम्यान सर्व घटनेचे स्पाय कॅमे-याद्वारे शुटींग करण्यासाठी किरण खाडे यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालकडील स्पाय कॅमेरा बसवलेली कपडे परिधान करण्यासाठी दिली. सदर स्पाय कॅमेरा डिव्हाईसमध्ये नवीन कंपनीचे मेमरीकार्ड इनसर्ट केले. त्याचे पुढील बाजुस EVM Elite 32 GB 10C 1U V10 Micro SD Card व मागील बाजुस छापलेली अक्षरे व्यवस्थित दिसून येत नाहीत.

त्यानंतर मी दिलेल्या सुचनेवरून पोशि तावरे यांनी व्हाईस रेकॉर्डर सुरू करून शासकीय वाहन एमएच 12 युसी 4109 मध्ये किरण खाडे, तक्रारदार माळवे, दोन्ही पंच पडताळणी निवेदने 14.23 वाजता ध्वनिमुद्रीत केली. त्याचे पो.कॉ.कुमकर यंानी चित्रीकरण केले आहे. तोपर्यंत किरण खाडे यांना त्यांचा मोबा.क्र.8888862762 वर खाजगी इसम आबा वळकुंद्दे यांचा मोबा.क्र. 9766431581 वरून साधा कॉल आला व आबा वळकुंद्दे यांनी ते जलभावी गावापासून सुमारे 02 किमी अंतरावर असलेल्या माळशिरस-म्हसवड हायवेलगतच्या गारवाड गावचे पाटीवर आले असून किरण खाडे यांना त्यांनी सदर ठिकाणी भेटण्यास या असे सांगितले व फोन कट केला. सदरचा कॉल निवेदनाचे फाईलमध्येच ध्वनिमुद्रीत झाला आहे. त्यानंतर पोशि तावरे यांनी व्हॉईस रेकॉर्डर पुन्हा 14.43 वाजता चालु करून तो किरण खाडे यांना लावला व पोशि कुमकर यांनी स्पाय कॅमे-याचे बटन ऑन करून किरण खाडे यांना पंच क्र.1 श्री धुळे यांचेसोबत आबा वळकुंद्दे यांचे भेट घेणकामी खाजगी वाहन टाटा टिगोर वाहनाने रवाना केले.

तक्रारदार माळवे त्यांचे पाठोपाठ गेले परंतु त्यांचे भेटीचे ठिकाणी न जाता काही अंतर आधी थांबून ते दोघे परत आल्यानंतर त्यांचे पाठोपाठ परत देखील आले. किरण खाडे यांचेकडील रेकॉर्डर पोशि तावरे यांनी 15.14 वा. सुमारास वाजता बंद केला. त्यावेळी मी पंच क्र.1 यांना घडलेली हकिकत विचारली असता त्यांनी सांगितले की, ते व किरण खाडे असे आबा वळकुंद्दे यांना गारवाड गावचे फाटयावर हॉटेल शिवनेरी येथे भेटले. त्यावेळी किरण खाडे व आबा वळकुंद्दे यांचेत गुन्हयातील अटकपुर्व जामीनाचे संदर्भाने चर्चा झाली. तसेच पोलीस अनिल शिंदे यांचा फोन अदयाप बंद लागत असल्याने डीवायएसपी वाळके यांचेपर्यंत पोहचण्याकरीता एका मध्यस्थीला सांगितले असून त्याचा संपर्क झाला की फोन करतो अशी चर्चा झाली. तसेच आबा वळकुंद्दे यांनी पोलीस अनिल शिंदे यांनी त्यांचेकडून रु.10,00,000/-स्वीकारल्याचे मान्य करून सदर रक्कम डीवायएसपी वाळके यांचेपर्यंत न पोहचल्याची माहिती किरण खाडे यांना दिली. अशी हकिकत पंच क्र.1 यांनी सांगितल्यानंतर किरण खाडे यांनी देखील त्यांचेप्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर मी दोन्ही पंचासमक्ष स्पाय कॅमे-याद्वारे चित्रीत झालेल्या फाईल्स ओपन करून त्या फास्ट फॉरवर्ड-बॅक करून पाहून किरण खाडे व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकत बरोबर असल्याची खात्री केली.

त्यानंतर तक्रारदार माळवे यांना आबा वळकुंद्दे यांचा साधा फोन कॉल येत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे 9011625697 वरून आबा वळकंुद्दे यांचे 9766431581 फोन केला असता आबा वळकुंद्दे यांनी तो घेतला व तक्रारदार माळवे यांना सांगितले की, आत्ताच किरण खाडे येवून त्यांना भेटून गेला. तसेच आबा वळकुंद्दे यांचा मोटेवाडी येथील चंदनाच्या कामाशी

संबंधीत असलेला माने नावाचा लंगोटी मित्र मध्यस्थी आहे ज्याची डीवायएसपी वाळके साहेबांसोबत ओळख असून आबा वळकुंद्दे यांनी माने यास सर्व हकिकत सांगितली असता त्या संदर्भाने माने यांनी डीवायएसपी वाळके यांना फोन केला. त्यावेळी डीवायएसपी वाळके यांनी माने यांना त्याअनुषंगाने बोलणी करण्यासाठी संध्याकाळी त्यांचे बंगल्यावर बोलाविले आहे. त्यामुळे माने हे संध्याकाळी भेटण्यास जाण्यापुर्वी आबा वळकंुदे यांना फोन करणार असून त्यावेळी तुम्ही या असे तक्रारदार माळवे यांना सांगितले. त्यावर तक्रारदार माळवे यांनी किरण खाडे यांना सोबत घेवून याचच का? अशी विचारणा केली असता नको तुम्हीच या व मानेंसोबत जावून डीवायएसपी साहेबांची भेट घेवून बोलणी करा असे सांगुन आणखी चर्चा करून फोन कट केला. सदर कॉल ध्वनिमुद्रीत करण्यात आलेला आहे.

संध्याकाळी सुमारे 20.00 वाजता आबा वळकुंद्दे यांनी त्यांचा मोबा.क्र. 9766431581 वरून तक्रारदार माळवे यांचे मोबाईल क्र. 9011625697 यावर साधा कॉल करून त्यांचा मोटेवाडी येथील मित्र माने हा डीवायएसपी वाळके यांच्या बंगल्यावर जाणार असून त्यांचेसोबत जाण्याकरीता किंवा डीवायएसीपी यांचेशी फोनवरून बोलण्याकरीता तुम्ही तासाभरात पालखी महामार्गावरील माळशिस बायपासजवळ दहा वाजता पर्यंत या असे सांगितले. त्याअनुषंगाने तक्रारदार माळवे यांचेसोबत पंच क्र.2 यांना पाठविण्याचे सर्वानुमते ठरवून मी दोन्ही पंच, तक्रारदार माळवे, किरण खाडे व सापळा पथकास योग्य त्या सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही सर्व 20.24 वाजता रवाना होवून त्या दरम्यान तक्रारदार व वळकुंद्दे यांचेमध्ये अनुक्रमे 20.27, 20.48 वाजता झालेल्या दोन साध्या फोन कॉलमध्ये वळकुंद्दे यांनी तक्रारदार यांना प्रथम माळशिरस बायपास व त्यानंतर पिलीव रोडवरील ब्रिज खाली येण्यास सांगितले. वरिल तिन्हीही कॉल पोशि तावरे यांनी त्यांचेकडील शासकीय व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत केलेले आहेत.

त्यानुसार माळशिरस बायपास येथे पोहचल्यानंतर तक्रारदार यांचे खाजगी वाहन एमएच 11 डीएच 9596 मध्ये पोशि तावरे यांनी तक्रारदार यांना 20.51 वाजता व्हॉईस रेकॉर्डर चालू केला व त्याचवेळी तक्रारदार यांनी परिधान केलेल्या कपडयाचे स्पाय कॅमे-याचे बटन पोशि कुमकर यांनी चालू करून तक्रारदार माळवे व पंच क्र.2 श्री खरे असे तक्रारदार यांचे वाहनाने माळशिरस बायपास येथून रवाना केले. त्यानंतर ते परत येवून पुण्याच्या दिशेने सुमारे अर्धा किमी अंतरावर रोडलगत थांबले. आम्ही सदर ठिकाणी पोहचल्यानंतर पोशि तावरे यांनी तक्रारदार यांना लावलेला व्हॉईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 22.20 वाजताची होती. त्याच वेळी पोशि कुमकर यांनी तक्रारदार यांनी परिधान केलेल्या स्पाय कॅमे-याचे बटन देखील बंद केले. मी पंच क्र.2 खरे यांना घडलेल्या हकिकतेबाबत विचारणा केली असता पंच क्र.2 खरे यांनी सांगितले की, ते व तक्रारदार माळवे असे तक्रारदार यांचे खाजगी चारचाकी वाहनाने पिलीव रोडवरील ब्रिजखाली गेले असता सदर ठिकाणी खाजगी इसम आबा वळकुंद्दे त्यांचा मोटेवाडी येथील मध्यस्थी मित्र माने व एक अनोळखी इसम असे भेटले. तक्रारदार व माने तक्रारदार यांचे भावाचे अटके संदर्भाने चर्चा झाली. त्या दरम्यान माने व डीवायएसपी वाळके यांचे बॉडीगार्ड वाघ यांचे दोन व्हॉटसप फोन कॉल झाले खाजगी इसम माने हे वाघ यांना “पण तुम्ही सांगितलं असलं की आपल्या विश्वासातला विषये...”असे विचारतात त्यावर वाघ माने यांना “साहेबांचं म्हणन होत फक्त आजच्या- उद्याच्या दिवस थांबा परवा सांगतो तुम्हाला... ते गडबड का कराया लागलेय ते त्याचं कारन सांगतो तुम्हाला उद्या सकाळ..” त्यावर माने यांनी होय

का असा प्रतिसाद दिला असता वाघ यांनी “ह्रा थांबा जरा...ह्यांला थोडं सस्पेंन्समध्ये ठेवा, करायचाय विषय पण थांबा थोडं” असे बोलून वाघ यांनी माने यांना उदया समक्ष बोलू असे सांगितले. त्यामुळे डीवायएसपी वाळके यांची भेट होवू शकली नाही. अशी हकिकत पंच क्र.2 खरे यांनी सांगितली. तसेच तक्रारदार माळवे यांनी देखील त्यांचेप्रमाणे हकिकत सांगितली. मी व्हॉईस रेकॉर्डरमधील व स्पाय कॅमे-यामधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड-बॅक करून ऐकून सर्व हकिकत खरी असल्याची खात्री केली. त्यानंतर मध्यस्थी व्यक्तीचे बॉडीगार्ड वाघ यांचेशी बोलणे झालेनंतर ते तक्रारदार यांना संपर्क करतील त्यावेळी पुढील पडताळणी कारवाई आजमाविण्याचे ठरवून दि.24/08/2026 रोजीची पडताळणी कारवाई स्थगित केली. सदरबाबत दि.24/08/2026 रोजीचा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आलेला आहे.

त्यानंतर दि.26/06/2026 रोजीचे रात्री किरण खाडे यांनी कळविले की, त्यांना मध्यस्थी इसम आबा वळकुंदे व महादेव माने यांनी फोन करून तक्रारदार संतोषकुमार माळवे यांना त्यांचा भाऊ संदिप माळवे यांचे अटकेच्या संदर्भाने पोलीस उचलणार आहेत आमचा तुमच्यावर विश्वास असून संदिप माळवेंच जावून दया तुम्ही तुमच्या आईवडिलांना गुन्हयात अटकेसंदर्भाने मदत करण्यासाठी डीवायसपी वाळके यांना बोललो आहे त्याची बोलणी करण्यासाठी तुम्ही आम्हा उदया दि.27/08/2026 रोजी दुपारी आम्हाला फोन करून भेटा असे सांगितल्याने त्यावेळी पडताळणी कारवाई आजमाविण्याचे सर्वानुमते ठरवून मी सापळा पथक व दोन्ही पंच साक्षीदार यांना दिलेल्या सुचनेप्रमाणे आम्ही सर्व ला.प्र.वि.पुणे कार्यालय येथे दि.27/08/2026 रोजी सकाळी हजर होवून 07.20 वाजता सापळा कारवाईकामी आवश्यक साहित्यासह शासकीय वाहन एमएच 12 युसी 4109 व एमएच 12 एन यु 5882 ने रवाना होवून पालखी महामार्गाद्वारे रवाना होवून किरण खाडे यांना संपर्क करून आम्ही शिखर शिंगणापुर मंदिराचे परिसरामध्ये 11.10 वाजता भेटलो. त्यावेळी किरण खाडे हे त्यांचेकडील चारचाकी वाहन महिंद्रा एक्सयुव्ही क्र.एमएच 53 ए 3200 सह सदर ठिकाणी हजर होते. श्री किरण खाडे यांना पंच क्र.1 श्री धुळे यांचेसोबत पाठवून पडताळणी कारवाई आजमाविण्याचे सर्वानुमते ठरविले व त्या अनुषंगाने मी किरण खाडे व दोन्ही पंच साक्षीदार यांना पडताळणी कारवाईचे अनुषंगाने सविस्तर सुचना दिल्या व पडताळणी निवेदनाकरीता नवीन सिलबंद पाकिटातुन काढुन एम रॉक 32 जीबी क्षमतेचे मेमरीकार्ड व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घातले. त्याचे पुढील बाजुस M ROCK 32 GB 10C Micro SD HC I व मागील बाजुस MR- XY06/26 2204B804729 BSTT0AP3611 Made in Taiwan असे छापलेले होते. त्यानंतर माझे सुचनेप्रमाणे पडताळणी घटनेचे व्हिडीओ शुटींगकरीता किरण खाडे यांनी ला.प्र.वि. पुणे विभागाकडील स्पाय कॅमेरा असलेली कपडे परिधान केली. पोशि तावरे यांनी मी दिलेल्या सुचनेवरून 12.33 वाजता श्री किरण खाडे, पंच क्र.1 श्री धुळे व पंच क्र.2 श्री खरे यांची पडताळणी निवेदने ध्वनिमुद्रीत केली. त्यानंतर श्री किरण खाडे यांनी त्यांचा मोबा.क्र.8888862762 यावरून खाजगी इसम महादेव माने यांचा मोबा.क्र. 9922163474 वर कॉल करून शिखर शिंगणापुर जवळ आल्याची माहिती दिली. त्यावर त्यांनी माळशिरसमध्ये या असे सांगितले. सदर कॉल पोशि तावरे यांनी व्हॉईस रेकॉर्डद्वारे ध्वनिमुद्रीत केला आहे. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरचा बॅटरी बॅकअप रहावा म्हणून आम्ही पालखी महामार्गावरील माळशिरस गावाचे पुर्वीचे गाव येळीव येथे पोहचलो. त्यावेळी 13.35 वाजता किरण खाडे यांना त्यांचे नमूद मोबाईल क्रमांकावर आबा वळकुंदे यांचा मोबा.क्र. 9766431581 वरून फोन करून माळशिरस बायपास येथे या असे

सांगितले. सदर कॉल देखील पोशि तावरे यांनी ध्वनिमुद्रीत केला. लागलीच मी दिलेल्या सुचनेवरून पोशि तावरे यांनी 13.36 वाजता व्हॉईस रेकॉर्डर पुन्हा चालू करून श्री किरण खाडे यांना लावला. तसेच पोशि कुमकर यांनी किरण खाडे यांनी परिधान केलेला व स्पाय कॅमेरा असलेल्या डिव्हॉईसचे बटन ऑन करून किरण खाडे यांना त्यांचे नमूद चारचाकी वाहनाने पंच क्र.1 यांचे सोबत रवाना केले. ते थोडयाच वेळयात 16.08 वाजता ते परत आले.

त्यानंतर मी पंच क्र.1 यांना घडलेल्या हकिकतेबाबतच विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, ते व किरण खाडे असे माळशिरस बायपास येथे पोहचलो असता आबा वळकुंदे यांनी जवळच असलेल्या हायवे ब्रिजखाली बोलावले. आम्ही तेथे गेलो. आबा वळकुंदे यांचेशी चर्चा करीत असताना महादेव माने तेथे आले. किरण खाडे यांनी वाळके साहेबांशी बोलणे करून दया असे सांगितले असता महादेव माने आबा वळकंुदे यांना त्यांचे मोटरसायकलवर बसवून घेवून गेले व सुमारे वीस मिनीटांनी परत आले. अंदाजे पाच मीटर अंतर ठेवून आबा वळकुंदे यांनी मला थांबवून किरण खाडे यांना त्यांचेजवळ बोलावून घेतले त्यानंतर महादेव माने व किरण खाडे यांचे दरम्यान किरण खाडे यांचे आई-वडिल यांचे अटके संदर्भाने चर्चा झाली. त्या दरम्यान किरण खाडे यांनी "काय व्हतयं माणसं भेल्यात की ओ" वळकंुदे आणि माने यांना सांगितल्यानंतर त्यावर वळकुंदे "ते तुम्ही आई-वडिलांना भेटा … म्हणजे आता ते पेमेंट एवढं हयांच्याजवळ हजर करा म्हणजे" असे किरण खाडे यांना सांगितल्यानंतर वळकुंदे यांचे बोलण्याला माने "नाय तुझ्याजवळ करुने माझ्याजवळ नको,.. आपण दोघजणं जावुन देऊ" असे वळकंुदे यांना सांगतात त्यानंतर वळकुंदे "हा … मग माझ्याजवळ तर आणुन दया" असे बोलून त्यास सहमती देतात. त्यानंतर थोडी चर्चा झाल्यानंतर किरण खाडे हे त्यांना दयावे लागत असलेल्या पैशाबद्दल "नाय नाय म्हंजे काय माहितीये का… मला पण शेवटी पेमेंटची भिती" असे बोलतात त्यावर माने हे डबल तुम्हाला रिटर्न देणार… मी का घात करु तुम्हाला एक बोलु का" असे बोलतात त्यानंतर आणखी चर्चा करून माने किरण खाडे यांना "आणि मी ज्या वेळेस फेन करील तेवढं माझंजवळ आणुन पोचवा. म्हातारा म्हातारी.. मी नेऊन सहया करुन नोटीस करुन आणतो" असे बोलून पैशाबाबत "ॲक्च्युली हिथं हाये तोवर गेलो असतो लगेच बर जावा लगेच" किरण खाडे यांना सांगतात त्यास दुजोरा देत वळकुंदे देखील किरण खाडे यांना "आज जेवढ आहे ते पाच लाख तेवढं घेऊन या … अन ते राहिलेल परत करु" असे सांगतात. त्यानंतर तक्रारदार "साहेबाकडुन ॲशुरन्स का घ्या म्हणजे मला काय आई घालुदे तिकडं डोक्याला ताप म्हंजी एकदा सुटीवाचुन खोकला गेला की," असे बोलले असता त्यावर माने हे त्यांना 307 मधनंच बाहेर काढतो अजुन लय सांगत नाय तुम्हाला.. टेंशन नका घेऊ.. या जाऊन" असे बोलून तक्रारदार यांना पैसे आणण्यास सांगतात त्यावर वळकुंदे "ते अजुन काय 5-50 हजार असलं ते वरचं घेऊन या बॉडीगार्डचं मिटवुन टाकु.. लगेच त्यांच्याकडुन काय तर" असे किरण खाडे यांना सांगून आबा वळकुंदे व महादेव माने यांनी किरण खाडे यांचे आई वडिलांना अटक न करता तपास अधिकारी डीवायएसपी वाळके यांना सांगुन त्यांनी बीएनएसएस कलम 35 (3) अन्वये नोटीस देवून सोडायला सांगतो त्यासाठी डीवीयएसपी यांचेकरीता रु.5,00,000/- लाचेची मागणी केली. परंतु डीवायएसपी वाळके व त्यांचा बॉडीगार्ड वाघ तसेच पोलीस अनिल शिंदे यांचेशी बोलणे करून दिले नाही. तसेच सदर रक्कम लगेच घेवून या असा तगादा लावण्याने किरण खाडे यांनी रक्कम जवळ नाही म्हसवड येथे असल्याचे सांगितले. त्यावर त्या दोघांनी म्हसवडला जा व रक्कम घेवून या

आम्ही येथे थांबतो असे सांगितले. त्यामुळे किरण खाडे व पंच क्र.1 असे किरण खाडे यांचे नमूद वाहनाने म्हसवड येथे पोहचले. रस्त्यामध्ये असताना एक व म्हसवड येथे पोहचल्यानंतर 02 असे आबा वळकुंदे यांनी किरण खाडे यांना फोन करून लाच रक्कम कधी घेवून येताय व पाच लाख रुपयांसोबत आणखी पाच पन्नास हजार जास्त घेवून या म्हणजे ते डीवायएसपी यांचे बॉडीगार्डला दिले तर तो लाचेची रक्कम डिवायएसपी यांचेपर्यंत पोहचवेल तसेच लाचेची रक्कम आमच्या हातात मिळाल्यानंतर डीवायएसपी यांचे बॉडीगार्डशी बोलणे करून देतो असे सांगितले.

आबा वळकुंदे यांनी डीवायएसपी त्यांचा बॉडीगार्ड किंवा शिंदे यांपैकी कोणाशीच बोलणे अगर भेट न करून दिल्याने किरण खाडे व पंच क्र.1 असे सापळा पथकास मॅसेज करून गोरडवाडी येथील बिरोबा मंदिराजवळ परत आले. पैशाची जुळवा जुळव करून उदया दि.28/08/2026 रोजी फोन करा असे किरण खाडे यांना माने यांनी सांगितले. त्यानंतर मी व पंचांनी पडताळणी दरम्यान व्हॉईस रेकॉर्डरद्वारे ध्वनिमुद्रीत झालेल्या व व्हिडीओ चित्रिकरण झालेल्या रेकॉर्डींग ऐकून व पाहून वरिल सर्व हकिकत बरोबर असल्याची खात्री केली. खाजगी इसम आबा वळकुंदे व महादेव माने यांनी किरण खाडे यांचे आईवडिलांना अटक न करता बीएनएसएस कलम 35 (3) अन्वये नोटीस देण्यासाठी डिवायएसपी वाळके यांचेकरीता रु.5,00,000/- व त्यांचे बॉडीगार्ड यांचेकरीता वर पाच पन्नास हजार अशी लाच रकमेची मागणी केली परंतु ते त्यांची भेट अगर त्यांचेशी बोलणे करून देणार नाहीत. लाचेची रक्कम दिल्यानंतर ते बोलणे करून देण्याची शक्यता आहे. त्यामुळे खाजगी इसम आबा वळकंुदे व महादेव माने हे डिवायएसपी वाळके यांचेकरीता मागणी करीत असलेली रु.5,00,000/- व त्यांचे बॉडीगार्ड करीता आणखी पन्नास हजार अशी एकुण रु.5,50,000/- त्यांना दुसरे दिवशी म्हणजेच दि.28/08/2026 रोजी देवून त्यांचे विरुध्द सापळा कारवाई आजमाविण्याचे ठरवून दि.27/08/2026 रोजीची पडताळणी कारवाई सर्वानुमते स्थगित करण्यात आली. सदरबाबत दि.27/08/2026 रोजीचा सविस्तर पडताळणी पंचानामा करण्यात आलेला आहे.

त्यानंतर मी दिलेल्या सुचनेनुसार दि.28/08/2026 रोजी 11.00 वाजताचे सुमारास तक्रारदार श्री माळवे, किरण खाडे हे त्यांचे चारचाकी वाहन महिंद्रा एक्सयुव्ही क्र.एमएच 53 ए 3200 व दुचाकी वाहन होन्डा स्पेलंंडर क्र. एमएच 11 डीजी 8324 सह आम्हाला पालखी महामार्गावरील नातेपुते बायपास येथील हॉटेल गोल्डन इरा लॉजमध्ये सापळाकारवाईकामी भेटले. सदर ठिकाणी माझेसोबत सापळा पथक व दोन्ही पंच साक्षीदार देखील उपस्थीत होते. त्यावेळी किरण खाडे यांना पंच क्र.1 श्री धुळे यांचेसोबत पाठवून सापळा कारवाई आजमाविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यावेळी मी दोन्ही पंचासमक्ष किरण खाडे यांना खाजगी इसम आबा वळकुंदे व महादेव माने यांचे विरुध्द करण्यात येणा-या सापळा कारवाईकामी लाच रकमेबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचे बचतीमधील रु.1,00,000/-(भारतीय चलनातील रुपये 500/- दराच्या एकुण 200 नोटा) रक्कम समक्ष हजर केली. या व्यतिरिक्त अधिक रक्कम त्यांचेकडे नसल्याचे किरण खाडे यांनी सांगितले. त्यामुळे मागणी झालेल्या रक्कम रुपये 5,50,000/- सापळा रक्कमेमध्ये उर्वरित रु.4,50,000/- रक्कमेकरीता खोटया खेळण्यातील एकुण 900 नोटा वापरण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर किरण खाडे यांना ला.प्र.वि. पुणे विभागाकडील स्पाय कॅमेरा लावलेली कपडे परिधान करण्यास दिली असता त्यांनी परिधान केला. त्यानंतर मी दिलेल्या सुचनेवरून पोहवा सोनवणे यांनी उपस्थित सर्वांना अॅथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे गुणधर्म समजावून सांगितले त्यानंतर पोहवा

सोनावणे यांनी श्री किरण खाडे यांनी हजर केलेली रु.1,00,000/- व खेळण्यातील एकुण 900 नोटां ंना अँथ्रासिन पावडर लावून त्याबाबतची प्रात्यक्षिके करून दाखविली. तसेच सदर रक्कमेपैकी डीवायएसपी वाळके यांचे करीताचे रु.5,00,000/- रक्कमेच्या नोटांचे रबरच्या सहाय्याने दोन बंडल करून एका वर्तमानपत्रामध्ये गुंडाळुन वर्तमान पत्राचे आवरण रबरच्या सहाय्याने पॅक करून ते बंडल एका काळया, राखाडी व लाल चौकट चौकोनी आकाराच्या कापडी डब्याच्या पिशवीमध्ये ठेवली. तसेच डीवायएसी वाळके यांचे बॉडीगार्ड वाघ यांचेकरीताचे रु.50,000/-ही रक्कमेच्या नोटा रबरच्या सहाय्याने बंडल करुन सदर कापडी पिशवीमध्ये ठेवली. संपुर्ण रक्कमेस, पॅकिंगकरीता वापरेलेले वर्तमानपत्र व कापडी पिशवीस अँथ्रासिन पावडर लावण्यात आली. त्यानंतर पोहवा सोनावणे यांनी सदर कापडी पिशवी किरण खाडे यांचे नमूद चारचाकी वाहनाचे डिक्कीमध्ये ठेवली. त्यानंतर मी उपस्थित सर्वांना सापळा कारवाईचे अनुषंगाने सविस्तर सुचना दिल्या. त्यामध्ये किरण खाडे यांचेकडून लाच रक्कम स्विकारल्यानंतर त्यांनी त्यांचा हात रुमाल काढून चेह-यावर फिरवून लाच रक्कम स्वीकारलेबाबत इशारा करण्याच्या सुचना दिल्या तसेच लाच रक्कमेचा स्विकार केल्यानंतर आरोपींना ताब्यात घेतवेळी संपुर्ण घटनेचे चित्रीकरण करण्याच्या सुचना पो.शि.कुमकर यांना दिल्या. त्यानंतर तक्रारदार व किरण खाडे हे त्यांचेकडील वाहनाने व मी, दोन्ही पंच व सापळा पथक असे शासकीय वाहन क्र.एमएच 12 युसी 4109 ने सदर गोल्डन इरा लॉज येथून निघून नातेपुते गावात जाणा-या अंतर्गत डांबरी रस्त्यालगत कॅनॉलचे शेजारी थांबून श्री किरण खाडे यांचे नमूद चारचाकी वाहनामध्ये पोशि तावरे यांचे मार्फतीने सापळा कारवाईकरिताची तक्रारदार माळवे, किरण खाडे पंच क्र.1 व पंच क्र.2 यांची सापळा निवेदने 12.10 वाजता निवेदने ध्वमिमुद्रीत केली. त्यावेळी पोशि कुमकर यांनी त्यांचेकडील शासकीय व्हिडीओ रेकॉर्डरमध्ये व्हिडीओ शुटींग देखील केले आहे. त्यानंतर सुमारे 12.50, 13.47, 13.49 व 13.51 वाजता दरम्यान आबा वळकुंदे यांचा मोबा.क्र. 9766431581 वरून माझा मोबा.क्र. 8888862762 वर आमचेत 04 वेळा व्हॉटसप कॉलिंग झाले त्या दरम्यान वळकुंदे यांनी तुम्ही माळशिरसमध्ये आल्यानंतर कॉल करा त्यावेळी मी माने यांना कॉल करून बोलावून घेतो तसेच पीलीव रस्त्यावर पालखी महामार्गावरील ब्रिज खाली या असे किरण खाडे यांना सांगितले.

त्यानंतर माझे सुचनेवरून पोशि तावरे यांनी व्हॉईस रेकॉर्डर 14.01 पुन्हा चालु करून तो किरण खाडे यांना लावला त्याचवेळी किरण खाडे यांनी परिधान केलेल्या कपडयास लावलेल्या स्पाय कॅमेरा डिव्हॉईसचे बटन पोशि कुमकर यांनी सुरू केले व किरण खाडे यांना त्यांचे चारचाकी वाहन एमएच 53 ए 3200 ने पंच क्र.1 श्री धुळे यांचेसोबत खाजगी इसम आबा वळकुंदे व महादेव माने यांची भेट घेणेकामी पीलीव रोडवरील पालखी महामार्गाने ब्रिजच्या दिशेने रवाना केले. त्यांचे मागोमाग पोलीस निरीक्षक म्हात्रे व पोशि तावरे असे तक्रारदार माळवे यांची दुचाकी क्र. एमएच 11 डीजी 8324 रवाना झाले. तसेच पंच क्र.2 व उर्वरित सापळा पथकासह मी शासकीय क्र.एमएच 12 युसी 4109 ने त्यांचेपाठोपाठ रवाना झालो. त्यानंतर पोशि तावरे व पोनि म्हात्रे हे त्यांचेकडील दुचाकीने किरण खाडे यांचे वाहनाचे अगोदर पिलीव रोडवरील ब्रिजखाली जावून थांबले. आमचे शासकीय वाहन तक्रारदार यांचे वाहनाचे काही अंतर सोडून मागे होते माळशिरस बायपास पास केल्यानंतर पिलीव रोडवरील ब्रिज सुरू होतानाच उपरस्त्याला आबा वळकुंदे त्याचे द ुचाकीसह उभा होता. त्यांना पाहून किरण खाडे यांनी वाहन थांबवले. त्यानंतर पुढील थोडयाच वेळात खाजगी इसम माने हे देखील

किरण खाडे यांचे गाडीजवळ आले. त्यांचेत चर्चा झाली. त्यानंतर किरण खाडे व पंच क्र.1 त्यांचे वाहनाने व खाजगी इसम वळकुंदे व माने हे त्यांचे त्यांचे दुचाकी वाहनाने सदर ठिकाणावरून रवाना होवून ब्रिजचे खाली गेले. आम्ही देखील ते दिसतील अशा बेताने त्यांचे आजुबाजुस सापळा लावून थांबलो. किरण खाडे त्यांचे वाहनातुन उतरून खाजगी इसमांचे जवळ गेले. थोडी चर्चा झालेनंतर तक्रारदार त्यांचे वाहनाजवळ गेले व डिक्की उघडून त्यामधील लाच रक्कम ठेवलेली कापडी पिशवी बाहेर काढली व पुन्हा वळकंुदे व माने यांचेजवळ गेले. त्यावेळी किरण खाडे यांनी लाचेची रक्कम असलेली पिशवी उजव्या हाताने त्यांचे समोर धरली असता वळकुंदे यांनी त्यांचे दोन्ही हाताने स्वीकारून त्यांचे दुचाकीचे हॅन्डलचे डाव्या बाजुस अडकवली.

त्यावेळी किरण खाडे यांनी त्यांचा हात रुमाल काढून चेह-यावर फिरवून लाच रक्कम स्वीकारलेबाबत पुर्वनियोजीत इशारा केला असता मी सापळा पथकासह त्यांचे जवळ गेले. त्यानंतर पो.शि.कुमकर यांनी त्यांच्या जवळील शासकीय व्हिडीओ कॅमेरा सुरू केला. त्यावेळी पोशि तावरे यांनी किरण खाडे यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 14.30 वाजताची होती. तसेच त्याचवेळी स्पाय कॅमे-याचे बटन देखील बंद केले. त्यानंतर पोशि तावरे व पोनि म्हात्रे यांनी माने यांना पकडून ठेवले तसेच सपोफौ बाटे यांनी आबा वळकुंदे यांचे दोन्ही हात पकडून ठेवले. त्यानंतर मी नमूद दोघांना माझे शासकीय ओळखपत्र दाखवून माझी ओळख करून दिली. त्यावेळी पंच क्र.1 यांना विचारणा केलेवरून त्यांनी लाचेची रक्कम आबा वळकुंदे यांनी स्वीकारल्याचे सांगितले. त्यानंतर आबा वळकुंदे यांना लाच रक्कमेबाबत विचारणा करता त्यांनी त्यांचेसोबत आणलेल्या दुचाकीकडे इशारा करून हॅन्डलला अडकविल्याचे सांगितले. त्यानंतर काळया कपडयाचे सहाय्याने अंधार करून आमच्या सर्वांचे हाताची व कपडयांची अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे उजेडात तपासणी करून दिली. त्यानंतर माझे सुचनेवरून पंच क्र.2 यांनी वळकुंदे यांनी त्यांचे दुचाकीचे हॅन्डलला अडकविलेली लाच रक्कम असलेली पिशवी त्यांचे ताब्यात घेतली. त्यानंतर काळया कपडयाचे सहाय्याने अंधार करून आबा वळकुंदे यांचे हाताची व कपडयाची अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे उजेडात तपासणी केली असता आबा वळकुंदे याचे दोन्ही तळहात व बोटाचे पे-यांना तसेच आबा वळकंुद यांचे दुचाकीचे डाव्या हॅन्डलला अँथ्रासिन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली. तशीच चकाकी हस्तगत केलेल्या नोटांवर, नोटा ठेवलेल्या कापडी पिशवीवर व तिचे आत तसेच किरण खाडे यांचे दोन्ही हाताचे तळहात व बोटाचे पे-यांना देखील दिसून आली. त्यानंतर हस्तगत केलेल्या रक्कमेतील नोटांचे नंबर व सापळापुर्व कारवाई दरम्यान पंच क्र.2 यांचेकडे नोट नंबर लिहून दिलेल्या कागदावरील नंबर यांची दोन्ही पंचांनी तपासणी केली असता ते तंतोतंत जूळुन आले. त्यानंतर मी आबा वळकंुदे यांना त्यांचे संपुर्ण नाव व पत्ता याबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचे नाव आबा सावळा वळकंुदे वय 48 वर्षे व्यवसाय- खाजगी चालक, रा.वळकुंदे मळा, 61 फाटा, ता. माळशिरस जि. सोलापुर व माने यांनी त्यांचे नाव महोदव पंढरी माने वय 39 वर्षे व्यवसाय - शेती रा.मोटेवाडी ता. माळशिरस जि.सोलापुर असे सांगितले. त्यानंतर त्या ठिकाणी रहदारीचा रस्ता असल्याने व पुडील कारवाई करणे सोयीचे नसल्याने खाजगी इसम माने व वळकंुदे यांना ताब्यात घेवून पुढील कारवाईकामी माळशिरस शासकीय विश्रामगृह येथे घेवून गेलो.

त्यावेळी मी पंच क्र.1 श्री. धुळे यांना घडलेल्या हकिकतेबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, ते व किरण खाडे असे किरण खाडे यांचे चारचाकी वाहनाने पालखी महामार्गाने माळशिरस

बायपास दिशेने रवाना झाल्यानंतर किरण खाडे यांना आबा वळकुंद्दे यांचे 14.05 वाजता असे व्हॉटसअॅप कॉल केला व कुठे आला आहे याबाबत माहिती घेतली. त्यानंतर आम्ही माळशिरस बायपास पास केल्यानंतर पिलीव रोडवरील ब्रिज सुरू होण्यापुर्वी उपुणेपरस्त्याला आबा वळकुंद्दे त्यांचे दुचाकीसह थांबलेले दिसल्याने किरण खाडे यांनी त्यांचेजवळ वाहन थांबवले व थोडयाच वेळात माने देखील सदर ठिकाणी आले. किरण खाडे यांचे समक्ष स्पीकर ऑन करून डीवायएसपी यांचे बॉडीगार्ड वाघ यांना फोन करून माने वाघ यांना "करतो विषय मग काल बोलल्यालो तुम्हाला" असे बोलतात त्यावर वाघ हा असे बोलतात त्यानंतर माने वाघ यांना "हा परत फक्त काही अडचणं येउ नये आपल्या म्हणजे शब्दावर चाललंय सगळं" असे बोलतात त्यावर वाघ माने यांना "नाई नाई काय नाय... मी बोल्लोय स्वत: साहेबांना" असे बोलून हमी देतात. त्यानंतर आबा वळकुंद्दे हे आम्हाला ब्रिज खाली घेवून गेले. किरण खाडे यांना माझ्या समक्ष लाच रकमेबाबत विचारणा केली असता किरण खाडे यांनी त्यांचे वाहनाच्या डिक्कीतुन लाच रक्कम असलेली कापडी पिशवी आणुन समोर धरली असता आबा वळकुंद्दे यांनी माझ्यासमक्ष स्वीकारून त्यांचे दुचाकीचे हॅन्डलला अडकविली. त्यावेळी किरण खाडे ते ते हयांच पण,, ऐका की,, ते डिवायएसपी चं ते पण तेपण 500-500 चा बंडल ठेवलाय ते देवुन टाका त्यांना" असे दोघांना सांगतात त्यावर वळकुंद्दे किरण खाडे यांना त्या बॉडीगार्डाच ते 50 त्यांच असे वळकुंद्दे खाडे यांना विचारतात त्यावर किरण खाडे बॉडीगार्डचं 50 आहेत ते बी देवुन टाका ना असे सांगतात त्यावर माने चालतंय बर चला असे बोलतात त्यानंतर किरण खाडे बगुन घ्या, बघुन घ्या ओ... ऐका ऐका बगुन घ्याओ..असे बोलल्यानंतर माने काय त्यात साहेब असे बोलतात त्यानंतर थोडी चर्चा करून किरण खाडे यांनी पुर्वनियोजित इशारा करताच आपण येवून तपासण्याकरून लाच रक्कम हस्तगत केली व दोन्ही खाजगी इसम वळकुंद्दे व माने यांना पुढील कारवाईकामी ताब्यात घेतले. अशी हकिकत पंच क्र.1 श्री धुळे यांनी सांगितली. त्यानंतर मी किरण खाडे यांना विचारले असता त्यांनी देखील पंच क्र.1 यांचेप्रमाणेच हकिकत सांगितली. त्यानंतर सापळा कारवाई दरम्यान ध्वनिमुद्रीत झालेलं संभाषण व व्हिडीओ चित्रिकरण पाहून मी सर्व हकिकत बरोबर असल्याची खात्री केली.

त्यानंतर सापळा पंचनामा कारवाई चालू असताना तक्रारदार माळवे यांनी समक्ष येवून कळविले की, त्यांनी त्यांचे मुळ तक्रारीमध्ये अनिल शिंदे यांनी महिला पोलीस रुपाली फडतरे व वळकुंद्दे यांचे मार्फतीने दि.20/08/2026 रोजी रात्रौ 01.00 वाजता रु.10,00,000/- ही रक्कम प्राथमिक आरोग्य केंद्राशेजारी, सिध्दनाथ मंदिर कमानीजवळ, म्हसवड येथे स्वीकारल्याचे नमूद केले आहे. त्यानंतर त्याअनुषंगाने पोलीस रुपाली फडतरे यांचा मोबा. क्र. 7588382902 व अनिल शिंदे यांचा मोबा.क्र. 9922001659 यामध्ये व्हॉटसप कॉलिंगद्वारे बोलणे झालेलं असून त्यामध्ये रुपाली फडतरे यांनी पोलीस शिंदे यांना "तुम्हाला माहित मी स्वत: अॅडजेस्ट करुन 10 दिले मी म्हणते कस कस काय 9 लाख असु 10 लाख असु मी कस कस अॅडजेस्ट करुन दिले आता मी आज पण अॅडजेस्ट केलेत तर हे काय म्हणताय डीवायएसपी साहेबांपर्यत हे पैसेच पोच नाहीत माझी खात्री करण का आहे ना ओअसे बोलल्या असता त्यावर अहो तस काय कोणाची कर्मचा-याची हिंमत असती का बर एवढा सोप हाय का काम असे बोलून अनिल शिंदे यांनी डीवायएसी वाळके यांचेकरीता रु.10,00,000/- स्वीकारल्याचे निष्पन्न झाले. तसेच सदर व्हॉटसप कॉलवर बोलत असताना रुपाली फडतरे यांनी त्यांचेकडील दुस-या मोबाईलद्वारे सदर बोलण्याचे व्हिडीओ शुटींग देखील केले आहे. सदरचे व्हिडीओ

शुटींग व चार ऑडीओ फाईल रुपाली फडतरे यांनी महेश खाडे यांना पाठविले व महेश खाडे यांनी संतोषकुमार माळवे यांना पाठविली. सदर फाईल संतोषकुमार माळवे यांनी सॅनडिस्क कंपनीचे पेन ड्राईव्ह त्यावर BP2501008240Z SDDDC3 MADE IN CHINA असे छापलेले यामध्ये घालुन सदर पेनड्राईव्ह माझे व दोन्ही पंचासमक्ष समक्ष हजर केला आहे त्या पेन ड्राईव्हमधील फाईल्सचे स्क्रीप्ट तयार करून घेतलेले असून त्यावरून रूपाली फडतरे यांचेशी अनिल शिंदे यांनी बोलतेवेळी रू.10,00,000/-यापुर्वी स्विकारल्याचे कबुल केले असल्याचे दिसून येत आहे. पंचनाम्यादरम्यान लाचेची रक्कम त्यामधील डमी नोटांसह, स्पाय कॅमेरामध्ये इन्सर्ट केलेले मेमरी कार्ड, दि. 21/08/2026, 22/08/2026 व 24/08/2026 रोजी व्हाईस रेकॉर्डींग करतेवेळी वापरलेले मेमरी कार्ड, दि. 22/08/2026 रोजी व्हाईस रेकॉर्डींग करतेवेळी वापरलेले मेमरी कार्ड, निवेदन घेतेवेळी व लाच रक्कम हस्तगत करतेवेळी करण्यात आलेल्या व्हिडीओ चित्रीकरणासाठी वापरलेले मेमरी कार्ड, लाच रक्कम ठेवलेली पिशवी, आरोपींनी लाच रक्कम स्विकारतेवेळी वापरलेली दोन दुचाकी वाहने, आरोपींनी गुन्हा करतेवेळी वापरलेले मोबाईल फोन जप्त करण्यात आली आहेत तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

तरी तक्रारदार संतोष कुमार माळवे यांनी दि.21/08/2026 रोजी ला.प्र.वि. पुणे येथे नोंदविलेल्या तक्रारीचे अनुषंगाने त्याच दिवशी 15.15 ते 16.00 वाजता दरम्यान केलेल्या पडताळणी कारवाईमध्ये यातील खाजगी इसम आबा सावळा वळकुंदे यांनी दोन्ही पंचासमक्ष संदिप माळवे, महेश खाडे व त्यांचे कुटूंबियास त्यांचे विरुध्द अकलुज पोलीस स्टेशन येथे दाखल गुन्हयामध्ये त्यांना अटकपुर्व जामीनाकरीता मदत करण्यासाठी व गुन्हयात पीसी ॲन्ड पीएनडीटी या कायदयाची कलम न लावणसाठी लोकसेवक अनिल शिंदे व डीवाएसपी वाळके यांचेकरीता रु.25,00,000/- रकमेची लाच मागणी करून गुन्हयातील इतर 02 आरोपींसाठी रुपये दहा लाख लाचेची रक्कम स्वीकारल्याचे निष्पन्न झाले.

तसेच दि.27/08/2026 रोजीचे 13.36 ते 16.08 वाजता दरम्यान करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान खाजगी इसम आबा वळकुंदे व महादेव पंढरी माने यांनी तक्रारदार यांचे आईवडिलांना त्यांचेविरुध्द अकलुज पोलीस स्टेशन येथे दाखल गुन्हयात अटक न करता बीएनएसएस कलम 35(3)अन्वये नोटीस देण्यास सांगतो म्हणून डीवायएसपी श्री संतोष वाळके यांचेकरीता रु.5,00,000/- व पोलीस राहूल वाघ यांचेकरीता रु.50,000/- अशी एकुण रु.5,50,000/- लाचेची मागणी करून ती दि.28/08/2026 रोजी 14.30 वाजता पंचासमक्ष स्वीकारल्याचे निष्पन्न झाले म्हणून तसेच खाजगी इसम वळकुंदे व माने यांचे लाच मागणीस पोलीस राहूल वाघ यांनी अपप्रेरणा दिली तसेच रूपाली फडतरे यांनी लोकसेवक श्री. अनिल शिंदे यांचेशी केलेल्या संभाषणावरून लोकसेवक श्री. अनिल शिंदे यांनी रूपाली फडतरे यांचेकडून यापुर्वी रू. 10,00,000/- लाचेची रक्कम स्विकारली असल्याचे मान्य केल्याचे दिसून येत आहे म्हणून माझी त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम 7, 7 अ, 12 अन्वये कायदेशिर फिर्याद आहे.

माझा वरील घेतलेला फिर्यादी जबाब मी वाचून पाहिलेला असून तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष

पोलीस ठाणे अंमलदार
माळशिरस पोलीस ठाणे

**13.** **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Vishal Muralidhar Navale (पोलीस उप-अधीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Vishal Muralidhar Navale

**14.**

**Rank (हुद्दा):** Dy. SP (Deputy Superintendant of Police)

**No. (क्र.):** ProDysp

**Signature / Thumb impression of the complainant / informant**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15.** **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्‍ या/पाहिलेल्‍ या) शारीरिक वैशिष्‍ टये, व्‍ यंग आणि इतर तपशील**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्‍ मतारीख / वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्‍ या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1978 | | - | | चेचक: क्र. |
| 2 | पुरुष | 1987 | | - | | चेचक: क्र. |
| 3 | पुरुष | | | - | | चेचक: क्र. |
| 4 | पुरुष | | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्‍ यंग / वैशिष्‍ टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्‍ या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

| **Language/Dialect (भाषा/बोली)** | **Place of (चे ठिकाण)** | | | | | **Others (इतर)** |
|---|---|---|---|---|---|---|
| | **Burn Mark (भाजल्याचा खुणा)** | **Leucoderma (कोड)** | **Mole (तिळ)** | **Scar (व्रण)** | **Tattoo (गोदण)** | |
| **14** | **15** | **16** | **17** | **18** | **19** | **20** |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**

**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकाने यांची नोंद घेतली जाईल)**